P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad, Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** दिनांक - ११/११/२०२२

# पिंपरी चिंचवड पोलीस दलाच्या पुढाकाराने वस्ती/झोपडपट्टी भागातील बालकांना मिळणार दिशा.

## महानगरपालिका, बालकल्याण सामाजिक संस्था व सामाजिक कार्यकर्ते/प्रतिनिधी यांचे मदतीने बालकांच्या उज्वल भविष्यासाठी “दिशा” उपक्रम सुरु.

आज दिनांक ११.११.२०२२ रोजी पोलीस मुख्यालय, निगडी येथे मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांचे संकल्पनेतुन राबविण्यात येणा-या “दिशा” या उपक्रमांतर्गत सर्व पोलीस ठाणेहद्दीमध्ये वस्ती/झोपडपट्टी भागामध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला/गृहिणी समिती, बालकल्याण सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते/ प्रतिनिधी तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस ४०० हुन अधिक महिला व सामाजिक कार्यकर्ते/ समन्वयक उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना मा. श्री. अकुश शिंदे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांनी उपस्थित सर्व महिला /गृहिणी समिती, सामाजिक कार्यकर्ते/प्रतिनिधी यांना बालक हे देशाचे भविष्य असून जागतिक पातळीवर भारताला तरुणांचा देश म्हणून ओळख प्राप्त आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस ठाणेस्तरावर दाखल होणा-या विविध गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन बालकांचा सहभाग दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये प्रामुख्याने मिश्रवस्ती/ झोपडपट्टी भागामधील बालकांचे गुन्ह्याकडे वळण्यांचे प्रमाण अधिक असून अशा बालकांची सामाजिक पार्श्वभुमी पाहता व्यसनासाधीनता व अशिक्षितपणा इ. कारणांमुळे ही बालके न-कळत गुन्हेगारी मार्गावर गेल्याचे दिसुन येत आहे. या अनुषंगाने अशा दिशा भरकटलेल्या बालकांच्या उज्वल भविष्यासाठी “दिशा” हा उपक्रम पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात विशेष बाल पथक, गुन्हे शाखेच्या मार्फतीने राबविण्यात येत आहे. शहरात सद्यस्थितीत ७५ झोपडपट्ट्या अस्तित्वात आहेत. या उपक्रमांतर्गत सर्व वस्ती/झोपटपट्टी भागामध्ये महिला/गृहिणी समिती, व क्रिडा समन्वयक, शिक्षण समन्वयक आणि व्यसनमुक्ती समन्वयक असे एकुण ४०० हुन अधिक महिला व समन्वयकांची पोलीस ठाणेस्तरावर विना मोबदला नेमणूक करण्यात आलेली आहे. या महिला/गृहिणी समिती व समन्वयकांच्या माध्यमातुन व्यसनाच्या आहारी गेलेले बालक तसचे शाळाबाह्य बालकांना गुन्हेगारी मार्गावर जाण्यांपासून परावृत्त करुन त्यांना योग्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगुन उपस्थित सर्व महिला गृहिणी समिती, सामाजिक कार्यकर्ते/प्रतिनिधी यांना समाजासाठी आपण देत असलेले योगदान खरच कौतुकास पात्र असुन यामुळे नक्कीच या बालकांना योग्य दिशा मिळणार असल्याचे सांगुन पुढील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

मा. श्री. संजय शिंदे अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी “दिशा” या उपक्रमाचे प्रास्ताविक सादर करुन संपुर्ण उपक्राची थोडक्यात माहिती करुन दिली. तसेच विशेष बाल पथकाचे नोडल अधिकारी डॉ. सागर कवडे व त्यांची संपुर्ण टिम यांनी निगडी ओटा स्किम येथे राबविलेल्या क्रिडा उपक्रामुळे दिशा भरकटलेल्या बालकांना नवी दिशा मिळत असल्याचे सांगुन असे क्रिडा उपक्रम सर्व महिला समिती, सामाजिक कार्यकर्ते यांचे मदतीने एकत्र येवुन असे क्रिडा उपक्रम राबविल्यास अशा बालकांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून मोलाचे काम आपल्याकडून घडणार असल्याचे सांगुन सर्व उपस्थितांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मा. श्री चंद्रकांत इंदलकर उप-आयुक्त महिला व बाल विकास विभाग, पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेवतीने राबविण्यात येणा-या “लाईट हाऊस” या उपक्रमाची माहिती करुन दिली तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे वतीने राबविण्यात येणा-या दिशा या उपक्रमाचे कौतुक करुन महानगरपालिकेच्या वतीने या उपक्रमासाठी सर्वोतपरी मदत व सहकार्य केले जाईल असे बोलुन उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री. देवेंद्र चव्हाण पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली विशेष बाल पथक, गुन्हे शाखेचे श्री. संपत निकम (श्रेणी पोलीस उप-निरीक्षक) मपोना/ दिपाली शिर्के पोशि/अमोल मुठे, पोशि/कपिलेश इगवे, पोशि/भुषण लोहरे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. विवेक पाटील पोलीस उप-आयुक्त परिमंडळ -१ यांनी केले

सदर कार्यक्रमास मा. श्री. अंकुश शिंदे सो॥, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेसह श्री. संजय शिंदे सो॥, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, श्रीमती. स्वप्ना गोरे पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), श्री. विवेक पाटील पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ -१), श्री. सतीश माने सहायक पोलीस आयुक्त, (प्रशासन) श्री. श्रीकांत डिसले सहायक पोलीस आयुक्त (वाकड विभाग), श्री- देवेंद्र चव्हाण पोलीस निरीक्षक, विशेष बाल पथक गुन्हे शाखा तसेच सर्व पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी व समन्वयक पोलीस अधिकारी यांचेसह महिला/गृहिणी समिती, सामाजिक कार्यकर्ते/प्रतिनिधी आदी मान्यवर उपस्थित होते.

**(रावसाहेब जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा,
जनसंपर्क अधिकारी पिंपरी चिंचवड